529/५

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

निवडणूक महत्वाचे

जा.क्र.रासनिप्रा/वाढीव निवडणूक खर्च मंजूरी/ ५७९२/२०१५
दिनांक : ९/०६/२०१५

प्रति,

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

विषय :- सहकारी संस्थांच्या निवडणूकीत झालेल्या वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबतचे प्रस्ताव प्राधिकरणास सादर करणेपूर्वी घ्यावयाची दक्षता.......

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

राज्यातील प्रलंबीत असलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूका घेणेची प्रक्रिया बहुतांश पुर्णत्वाकडे आहे. निवडणूक निधीबाबत प्राधिकरणाने यापुर्वीच परिपत्रक निर्गमित केलेले आहेत. सदर परिपत्रकान्वये मंजूर मर्यादेपेक्षा जादा खर्च झाल्यास समर्थनीय कारणासह, विहीत केलेले विवरणपत्रात व खर्चाचे पृष्ठयर्थ पुराव्यासह प्राधिकरणास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यानी तालुका/जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे मार्फत सदर खर्चास मान्यता देणेचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेपासून तीन दिवसाच्या आत सदरचे प्रस्ताव आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह व शिफारशीसह प्राधिकरणास मंजूरीस्तव सादर करावे. तसेच सदर प्रस्तावासोबत खालील मुद्यांची माहिती असावी.

१) प्राधिकरणाने विहीत केलेले विवरण पत्र प्रस्तावासोबत जोडावे.

२) मा.जिल्हाधिकारी यांचेकडील दरसुचीप्रमाणे खर्च केला काय ? असल्यास सदर दरसुची प्रकरणात जोडावी.

३) विहीत प्रक्रिया म्हणजेच निवीदा/जाहिरात/कोटेशन घेतले होते काय ? व त्यांचा तुलनात्मक अभ्यास करुन निविदा अंतिम केल्या आहेत का ? कोटेशन/निविदा प्रती जोडण्यात याव्यात. तुलनात्मक तक्ता जोडावा.

४) निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांने पुरवठा दारांना दिलेल्या आदेशाच्या प्रती प्रकरणांत जोडाव्यात.

५) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पुरवठा दारास पेमेंट रेखांकित धानदेशाद्वारे/धनादेशांद्वारे /रोखीने - कशा पध्दतीने अदा केले आहे.

६) पेमेंट अदा होण्यासाठी पुरवठा दाराने निवडणूक निर्णय अधिकऱ्याला दिलेल्या लेखी पत्रांच्या प्रती सोबत जोडाव्यात.

७) पुरवठा दाराने पुरवठा केल्या बाबतचा पत्र व्यवहाराच्या प्रती जोडाव्यात.

८) पुरवठा दाराचे व्हौचरर्सचे छायांकित प्रती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांक्षाकित केलेल्या असाव्यात.

९) प्राधिकरणांचे दि.११/०५/२०१५ चे प्रपत्रातील माहिती सोबत जोडावी.

१०) मागील निवडणूकीत झालेल्या खर्चाची माहिती सोबत जोडावी.

तसेच ज्या सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया पुर्ण झाली आहे त्या सर्व सहकारी संस्थांची सोबत जोडलेल्या प्रपत्रातील माहिती सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. व प्राधिकरणास छाननी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह दिनांक ३०.०६.२०१५ पर्यंत सादर करावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण यांचे आदेशानुसार.**

(डॉ. आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण.
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,
सर्व कक्ष प्रमुख.

5२७|५

## -: प्रपत्र :-

| अ.क्र. | संस्थेचे नाव | बिनविरोध/ निवडणूक | सभासद संख्या | | | कार्यक्षेत्र | | | | मतदान ठिकाणीची संख्या | त्याअंतर्गत मतदान केंद्राची संख्या | मतदान केंद्र कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वैयक्तिक | संस्था सभासद | एकूण | तालुका | जिल्हा | विभाग | राज्य | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |

| मतमोजणी कर्मचारी संख्या | उमेदवारी अर्ज विक्रीतून व उमेदवार ठेव प्राप्त रक्कम रू. | उमेदवार ठेव जप्त रक्कम रू. | निवडणूक निधी जमा रक्कम | निवडणूकीसाठी झालेला खर्च रक्कम | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | परस्पर संस्थेकडून झालेला खर्च | निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडील प्राप्त निधीतून झालेला खर्च | एकूण खर्च | |
| १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |

(डॉ. आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.